अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | शनिवार
२५.०७.२०२६
वरुड
# दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
आषाढी एकादशी
विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
+91 7745067712
| वर्ष: ०७ | अंक: १७५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२ |
|---|---|---|---|

# चंद्रभागातीरी लोटला वैष्णवांचा महासागर

## पंढरीत २२ लाखांवर भाविकांच्या उपस्थितीत आषाढी एकादशी सोहळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पंढरपूर - रुप पाहता लोचनी। सुख जाले वो साजणी।। तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा।। बहुता सकृतांची जोडी। म्हणूनि विठ्ठली आवडी।। सर्व सुखाचे आगरु। बाप रखुमादेविवरु।।**

असे हृद्य स्वर म्हणत चंद्रभागा स्नान, नगर प्रदक्षिणा करत लाखो भाविकांच्या हरिनामाच्या जयघोषाने अवघी पंढरीनगरी दुमदुमली. सुमारे २२ लाख भाविकांच्या उपस्थितीत आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा साजरा झाला. पंढरीनगरी वैष्णवमय झाली. मठ, मंदिर, संस्थाने, ६५ एकर परिसरातील भक्तिसागरातील तंबू, राहुट्यांमधून भजन, कीर्तन व प्रवचनात भाविक दंग झाले. मानाच्या पालख्यांसह विविध संतांच्या पालख्यांबरोबर लाखोंच्या संख्येने भाविक आषाढी यात्रा एकादशीच्या मुख्य सोहळ्याला पंढरीत दाखल झाले. भाविकांमुळे मठ, मंदिरे, धार्मिक शाळा, संस्थाने गजबजून गेली. या वर्षी सुरुवातीला पाऊस चांगला झाल्याने पंढरपूर येथे भाविकांची प्रचंड गर्दी झाली. असंख्य भाविकांनी चंद्रभागा नदीत स्नानानंतर मुखदर्शन व कळस दर्शन घेण्यासाठी गर्दी केली, तितकीच गर्दी रांगेत उभे राहून पदस्पर्श दर्शन घेण्यासाठी झाली. मंदिर समितीच्या वतीने उभारण्यात आलेल्या दर्शन रांगेत एकादशी दिवशी सुमारे ५ लाख भाविक प्रतीक्षा करत होते. दर्शन रांग पत्रा शेडच्या बाहेर पडून गोपाळपूरपर्यंत पोहोचून येथून पुढे रांझणी रोडवर गेली आहे. दर्शन रांगेतील भाविकांना दर्शन मिळण्यास सुमारे १२ ते १४ तासांचा अवधी लागत असल्याचे मंदिर समितीकडून सांगण्यात येत आहे. स्नानानंतर दर्शन घेऊन भाविक प्रसाद, पेढे, कुंकू-बुक्का, अगरवत्ती खरेदीकडे वळत असल्याचे चित्र दिसून येते. यामुळे मंदिर परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजून गेली. प्रासादिक साहित्यांची विक्री जास्त होताना दिसून येत आहे. एकादशी, द्वादशी तसेच गोपाळकाल्यापर्यंत बाजारपेठेत मोठी उलाढाल होईल, अशी माहिती स्थानिक व्यापाऱ्यांकडून मिळत आहे.

**मोठा बंदोबस्त**

आषाढी यात्रेत चोऱ्या रोखण्यासाठी दामिनी पथक तैनात होते. त्याचबरोबर मुख्यमंत्री महापूजेला आल्याने विशेष सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती सुमारे ८.११७ हजार अधिकारी वपोलिस कर्मचारी यात्रेकरिता तैनात करण्यात आले आहेत. ७ ठिकाणी आपत्कालीन विभाग कार्यरत ठेवले होते. भाविकांना काही अडचण आल्यास त्वरित संपर्क करता येत आहे. आरोग्य कर्मचारी, आरोग्य पथके तैनात असल्याने वेळीच भाविकांना औषधोपचार करण्यात येत आहेत.

| ✻ दर्शनरांग पोहचली गोपाळपूरच्या पुढे | ✻ ६५ एकर परिसर भाविकांनी ओसंडला | ✻ गतवर्षीपेक्षा यंदा जास्त गर्दी |
|---|---|---|



पंढरपूर : श्री विठ्ठलाच्या महापूजेप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता फडणवीस, महापूजेचे मानकरी माने दाम्पत्य आदी.

**महिला भाविकांची संख्या जास्त** आषाढी यात्रेकरिता यंदा विशेष रेल्वे गाड्या पंढरपूरपर्यंत सोडण्यात आल्या आहेत. सुमारे ५,२०० एसटी बसेस भाविकांच्या सेवेकरिता धावत आहेत. महिला व ज्येष्ठ नागरिकांना विशेष सवलत योजना असल्यामुळे महिला भाविकांची संख्या जास्त दिसून येत आहे. शहराबाहेर तात्पुरती चार बसस्थानके तयार करण्यात आली असून त्या त्या विभागाकडे बसेस मार्गस्थ करण्यात येत आहेत.

### विठुरायाच्या रथाला गर्दी

आषाढी एकादशीनिमित्त श्री विठुरायाचा रथ काढला जातो. या रथावर खारीक व खोबरे उधळले जाते. असंख्य भाविकांना थेटपणे विठुरायाचे दर्शन होत नाही. त्यांना दर्शन देण्यासाठी प्रत्यक्ष देवच रथयात्रेच्या माध्यमातून दर्शन देतात, अशी भाविकांची धारणा असते. या रथालाही भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.





# अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री प्रधान यांचा राजीनामा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** - केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी (दि.२५) त्यांच्या पदाचा राजीनामा दिला. नीट-यूजी २०२६ पेपरफुटीच्या कथित वादाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आपला राजीनामा सादर केल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र सरकार आणि कॉकरोच जनता पार्टी यांच्यात होणाऱ्या तिसऱ्या फेरीच्या चर्चेपूर्वी ही महत्त्वाची घडामोड घडली आहे. देशभरातील आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या सीजेपीने धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याला वारंवार आपली 'तडजोड न होणारी' मागणी असल्याचे म्हटले होते. सविस्तर पत्रात प्रधान यांनी नीट-यूजी २०२६ परीक्षेतील कथित अनियमिततेमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपण पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले आहे. ३ मे रोजी समोर आलेल्या कथित अनियमिततेनंतर केंद्र सरकारने केलेल्या उपाययोजनांचाही त्यांनी या पत्रात उल्लेख केला. यामध्ये केंद्रीय अन्वेषण विभाग चौकशी, परीक्षा रद्द करणे, २१ जून रोजी पुन्हा परीक्षा घेणे आणि परीक्षा संगणकाधारित पद्धतीने घेण्याचा निर्णय यांचा समावेश असल्याचे त्यांनी नमूद केले. १६ जुलै रोजी निकाल जाहीर झाल्यानंतर सुधारित परीक्षा प्रक्रियेमुळे वंचित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांनाही चांगली कामगिरी करता आल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.


**'युवा शक्ती हीच मोठी ताकद'**

शिक्षण हे आपल्या सार्वजनिक जीवनाच्या केंद्रस्थानी कायम राहिले असल्याचे सांगत प्रधान यांनी भारतातील तरुण हीच देशाची सर्वात मोठी ताकद असल्याचा विश्वास व्यक्त केला. केंद्रीय शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतरही आपण देशसेवा सुरू ठेवणार असून, शैक्षणिक सुधारणा आणि सार्वजनिक सेवेसाठी कटिबद्ध राहू, असे त्यांनी स्पष्ट केले.

### जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मोठं यश




**काय म्हणत होते? या सरकारमध्ये राजीनामा होत नाही, पण आपण करून दाखवलं! सरकारसमोर झुकला नाही, तर भल्याभल्यांचे राजीनामे होतील, घाबरला तर कसली लोकशाही? अभिजित दिपकेंनी विजयी हुंकार भरला!**



















# घरगुती सौर वीज निर्मिती संच बसवुन सुद्धा हजारोंचे वीज देयक

## माजी नगरसेवक धनंजय बोकडे यांनी दिला आंदोलनाचा ईशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – घरगुती सौर वीज निर्मिती संच बसवुन सुद्धा हजारोंचे वीज देयक येत असून वितरण विभागाचां मनमर्जी कारभार सुरु आहे, असा आरोप माजी नगरसेवक धनंजय बोकडे यांनी केला असून आंदोलनाचा इशारा दिला आहे.

महाराष्ट्र शासनाने सामान्य जनतेला वीज माफी न देता दुसरा उपाय म्हणुन सौर ऊर्जा निर्मिती संच घरोघरी बसवून जनतेला स्वतः वीज निर्माता बनवले. मात्र वीज वितरण विभाग त्यात सुद्धा जनतेला लुटायला बसले आहे असे दिसते.



सौर संच दिवस भरात जितकी जास्त वीज निर्मिती करते, त्यातील ६५ ते ७५ टक्केच वीज आम्ही ग्रहण करतो, असे आता उत्तर देत आहे. जर ३ ते ५ किलो व्हॅटचे असेल आणि त्याची वीज निर्मिती मर्यादा १८ ते २० युनिट दिवसाला आहे तर त्यातील अर्धे युनिट आम्ही स्विकार केले आहे, असे सांगुन जसे आधी देयक द्यायचे तितकेच वीज देयक महिन्याला पुन्हा देत आहे.

जर वीज वितरण यातील अर्धे युनिट स्विकार करतात तर मग अतिरिक्त तयार झालेली वीज कुठे जाते, हा यक्ष प्रश्न आता उपस्थित होत आहे. महिन्याला सौर संचाचे बँकेत भरले जाणारे हफ्ते आणि महिन्याच वीज देयक एकत्र केल्यास आधी पेक्षा जास्त वीज बिल आता जनतेला भरावा लागत आहे. ही एक प्रकारे हुकूमशाही लुट वीज वितरण तर्फे सुरु आहे.

स्मार्ट मिटर बसाविल्यापासुन अतिरिक्त वीज वापर दाखविला जात असून सौर ऊर्जा वीज निर्मिती संच बसवुन फसवणुक वीज वितरण मार्फत झाल्याची भावना जनतेत निर्माण होत आहे.

होणारी आर्थिक लुट वीज वितरण कंपनी तर्फे तात्काळ थांबवावी अन्यथा सौर ऊर्जा निर्मिती संच बसविलेले सर्व ग्राहकांना घेऊन वीज वितरण कार्यालयात आंदोलन करु, असा इशारा माजी नगरसेवक धनंजय बोकडे यांनी दिला आहे.

---

## नगराध्यक्ष ईश्वर सलामे व सुवर्णा वरखेडे यांचे हस्ते पार पडला

# नवीन राजमाता जिजाऊ एसटी बसेसचा लोकार्पण सोहळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वरुड आगारामध्ये दाखल झालेल्या ५ नवीन राजमाता जिजाऊ एस.टी.बसेसचा लोकार्पण सोहळा नुकताच बसस्थानक परिसरात पार पडला.

आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश लाभले असून प्रवासी बांधवांच्या सोयीसाठी वरुड नगरीला नव्या बसेस प्राप्त झाल्या आहेत.





या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत.

यावेळी त्यांनी वरुड बसस्थानक परिसरात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने आणखी सुविधा निर्माण करण्याचे आश्वासन दिले.

याप्रसंगी वरुडचे नगराध्यक्ष ईश्वर सलामे, उपाध्यक्षा कविता उपरकर, शेंदुरजनाघाटच्या नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे, उपाध्यक्षा सुनिता वंजारी, भाजपा तालुकाध्यक्ष राजकुमार राऊत, माजी जि.प.सदस्य श्रीधर सोलव, बांधकाम समिती सभापती जीवन मालपे, शिक्षण समिती सभापती प्राजक्ता चौधरी, आरोग्य समिती सभापती विनय खासबागे, पाणीपुरवठा समिती सभापती अनिता पराते, नियोजन व विकास समिती सभापती पुष्पा पवार, उपसभापती भाग्यश्री अधव यांचेसह वरुड आगाराचे व्यवस्थापक आकाश तागडे, सहायक कार्यशाळा अधिक्षक शिवा उके, अधिकारी, कर्मचारी, नागरिक, नगर परिषद वरुड व शेंदूरजनाघाटचे नगरसेवक, नगरसेविका तसेच भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात पोलिसांची मोठी कारवाई : फरार मुख्य आरोपी बिजेंद्र गुप्ताला बिहारमधून अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – टीईटीच्या पेपरफुटी प्रकरणात एक मोठी अपडेट समोर आली आहे. टीईटी पेपर फुटी प्रकरणातील मुख्य आरोपीला बिहारमधून अटक करण्यात आली आहे.

बीजेंदर कुमार गुप्ता असं या आरोपीच नाव असून त्याला बिहारमधून पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, या मुख्यसूत्रधार आरोपीला पोलिसांनी बिहारमधून मुंबई आणि नंतर भिवंडी येथे आणण्यात येत आहे. या प्रकरणी आतापर्यंत या १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर याआधी १२ आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी मोठी कारवाई करत यातील फरार मुख्य आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहे. अवघ्या आठ हजार रुपयांमध्ये मिळवला पेपर, दीड कोटीमध्ये विक्रीचा बेत, पण... मिळालेल्या माहितीनुसार, बीजेंदर कुमार गुप्ता हा पेपर फुटी प्रकरणातला मुख्य आरोपी होता. विजेंदर कुमार गुप्ता याने साथीदार सोनूसह मिळून छापखान्यातील कर्मचाऱ्यांना पैसे व प्रॉपर्टीचे आमिष दाखवून पेपर मिळवले. छापखान्यातून बुटात लपून पेपर बाहेर काढण्यात आले होते. तब्बल दीड कोटीमध्ये या पेपरची विक्री होणार होती. परंतु भिवंडी पोलीस ग्राहक बनून भिवंडीत टीईटी पेपर विक्रीचा पर्दाफाश केलाय. पटना येथे थरारक कारवाई; मुख्यसूत्रधार फरार आरोपी ठाणे पोलिसांच्या जाळ्यात भिवंडीच्या कोनगाव पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक २८१/२०२६ मधील फरार असलेल्या आरोपींला ठाणे शहर आयुक्तालयातील भिवंडी पोलिसांनी बिहारमधील पटना येथे अत्यंत नियोजनबद्ध व धाडसी कारवाई करत ताब्यात घेतले.

---

## लोकमान्य मतिमंद निवासी विद्यालयात

# दैविक खंडेलवाल यांचा वाढदिवस साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील युवा सामाजिक कार्यकर्ता दैविक खंडेलवाल यांनी त्यांचा वाढदिवस लोकमान्य मतिमंद निवासी विद्यालय नरखेड या शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत साजरा केला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त



विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. दैविक खंडेलवाल यांना शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी त्यांचे मित्र यज्ञेश यावलकर, प्रद्युम्न छांगाणी, पियुष पोतदार, प्रणव कुंभारे प्रामुख्याने उपस्थित होते. समाजातील दीनदुबळ्या गरजवंत विद्यार्थ्यांना मदत करणे हे आम्हा युवकांचे कर्तव्य असल्याचे मनोगत याप्रसंगी दैविक खंडेलवाल यांनी केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार जितेंद्र शेटीये यांनी मानले.

---

# सिंधुदुर्ग जिल्हा बँकेला १३.३० लाखांचा दंड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**सिंधुदुर्ग**– भारतीय रिझर्व्ह बँकेने विविध नियामक तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी देशातील सहा सहकारी बँकांवर आर्थिक दंडाची कारवाई केली आहे. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर १३.३० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. सहा बँकांवर एकूण २७.३० लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. सर्वाधिक दंड सिंधुदुर्ग जिल्हा बँकेवर आहे. कारवाईत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि छत्तीसगडमधील अन्य सहकारी बँकांवरही विविध नियमभंगांप्रकरणी आर्थिक दंड ठोठावण्यात आला आहे.

---




## नॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये

# विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – लोकमान्य टिळक जयंतीच्या औचित्य साधून नॅशनल इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी वरिष्ठ दंत वैद्य डॉ.आनंद झामडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी डॉक्टर देखील उपस्थित होते. डॉ.झामडे यांनी विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी केली तसेच दातांची योग्य काळजी कशी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक विनोद भोंगाडे आणि सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होते. शिबिरात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना ब्रश करण्याची योग्य पद्धत, साखरयुक्त पदार्थांचे दुष्परिणाम आणि नियमित तपासणीचे महत्व समजावुन सांगितले.

शाळेच्या वतीने डॉ.आनंद झामडे आणि त्यांच्या टीमचे आभार मानण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी असे उपक्रम पुढेही राबवले जातील असे मुख्याध्यापक विनोद भोंगाडे यांनी सांगितले.

---

## तालुका विधी सेवा समितीच्या वतीने

# अंमली पदार्थ जागरुकता व आरोग्य कल्याण मार्गदर्शन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)






**वरुड** – तालुका विधी सेवा समिती वरुडच्या वतीने एन.टी.आर.हायस्कूल व शंकरराव बंदे कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय 'जागतिक लोकसंख्या दिन व जागतिक न्याय दिन' निमित्य अंमली पदार्थाबाबत जागरुकता आणि आरोग्य कल्याण मार्गदर्शन आणि संवाद योजना-२०२५ बाबत जनजागृती करण्याकरीता जागृती योजना-२०२५ अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश म.दा.सैंदाणे तर प्रमुख पाहुणे म्हणुन सह दिवाणी न्यायाधीश आय.जे.ठाकरे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व्ही.व्ही.राजुरकर, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.ए.आर.घाटोळे, सचिव ॲड.रुपेश अळसपुरे, विधिज्ञ ॲड.डी.पी.सदापुरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश बरडिया यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व्ही.व्ही.राजुरकर यांनी हा दिवस दरवर्षी १७ जुलै रोजी साजरा करण्यात येतो, जगातील विविध गुन्हे व अत्याचारात बळी पडलेल्या पिडीतांना त्यांचे हक्काचे सरंक्षण मिळवुन देण्यासाठी आंतराष्ट्रीय फौजदारी न्यायालय हे नेदरलँड मधील हेग या ठिकाणी स्थापीत आहे असे विविध विषयांवर मार्गदर्शन केले .

याप्रसंगी आय.जे.ठाकरे यांनी अमली पदार्थ म्हणजे शरीर व मनाच्या नैसर्गीक कार्यामध्ये बदल किंवा ताबा होय. अमली पदार्थांमुळे आपल्याला शारिरीक, सामाजिक व आर्थिक दुष्परिणाम होतात. आजच्या पिढीला दारू, सिगारेट व गुटखा या अमली पदार्थासारखेच मोबाईलचे व्यसन आहे, प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाचे व्यसन असणे गरजेचे आहे, असे मार्गदर्शन केले.

ॲड.ए.आर. घाटोळे यांनी कायद्याची भाषा खुप कठीण आहे त्यामुळे कायदयामध्ये कुणीही परिपक्व नाही, प्रत्येक शब्दामध्ये कायदा व प्रत्येक कायदयाचं पुस्तक आहे, न्याय हा सर्वांना मिळणे आवश्यक असून लहान मुले व विद्यार्थ्यांना सुध्दा न्याय मिळणे आवश्यक आहे, असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म.दा.सैंदाणे यांनी वर्ग १० ते १२ हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक जिवणातील सर्वात महत्वाचे वर्षे असल्याने या काळात आपले संपुर्ण लक्ष अभ्यासावर असायला पाहिजे, या व्यतिरिक्त मोठमोठ्या लोकांच्या आत्मकथा वाचणे व खेळणे हे सुध्दा महत्वाचे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक सतिश डाखोळे तर आभार ॲड.डी.पी.सदापुरे यांनी मानले. कार्यक्रमाला तालुका वकिल संघ तर्फे वकील सदस्य, हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

### आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा.

### देवेंद्र फडणवीस : दूरदृष्टी, विकास आणि लोकाभिमुख नेतृत्व

महाराष्ट्राच्या राजकारणात काही नेते आपल्या कार्यशैलीमुळे, निर्णयक्षमतेमुळे आणि विकासाच्या दृष्टिकोनामुळे वेगळी ओळख निर्माण करतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यापैकी एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांचा वाढदिवस हा केवळ एका राजकीय नेत्याचा जन्मदिन नसून, विकासाभिमुख नेतृत्व, सुशासन आणि लोकसेवेच्या संकल्पनेचा उत्सव म्हणून अनेक ठिकाणी साजरा केला जातो. विशेषतः नागपूर ही त्यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी असल्याने तेथील नागरिकांसाठी हा दिवस अधिक अभिमानाचा आणि उत्साहाचा असतो. देवेंद्र फडणवीस यांचा जन्म २२ जुलै १९७० रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे वडील गंगाधरराव फडणवीस हे जनसंघाचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषद सदस्य होते. त्यामुळे सामाजिक व राजकीय कार्याचे संस्कार त्यांना बालपणापासूनच लाभले. नागपुरातच त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण झाले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थी संघटनांमधील सक्रिय सहभागातून त्यांनी नेतृत्वगुण विकसित केले. सार्वजनिक जीवनात लोकांशी संवाद साधण्याची आणि त्यांच्या समस्या समजून घेण्याची क्षमता त्यांच्यात लहानपणापासूनच दिसून आली. राजकारणातील त्यांचा प्रवास अत्यंत उल्लेखनीय आहे. अवघ्या २७ व्या वर्षी ते नागपूरचे महापौर झाले. त्या काळात देशातील सर्वांत तरुण महापौर म्हणून त्यांची नोंद झाली. नागपूर शहराच्या विकासासाठी त्यांनी अनेक दूरदृष्टीचे निर्णय घेतले. प्रशासनातील पारदर्शकता, आर्थिक शिस्त आणि नियोजनबद्ध विकास यांवर त्यांनी भर दिला. महापौर म्हणून मिळालेला अनुभव पुढे राज्याच्या नेतृत्वातही त्यांच्या उपयोगी पडला. पश्चिम-दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघातून त्यांनी सातत्याने जनतेचा विश्वास संपादन केला. अनेक वेळा आमदार म्हणून निवडून येणे ही त्यांच्या लोकप्रियतेची आणि जनतेशी असलेल्या दृढ नात्याची साक्ष आहे. मतदारसंघातील विकासकामे, नागरिकांशी सातत्याने संपर्क आणि लोकांच्या प्रश्नांवर तातडीने प्रतिसाद देण्याची त्यांची कार्यपद्धती यामुळे त्यांची प्रतिमा अधिक

# जय हरी विठ्ठल : भक्ती, समता आणि पंढरपूरची अखंड आध्यात्मिक परंपरा

'जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठल!' हा जयघोष कानावर पडला की मन प्रसन्न होते, भक्तीचा भाव जागृत होतो आणि नकळत पावले पंढरीच्या दिशेने वळू लागतात. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनात पंढरपूरचे स्थान अद्वितीय आहे. भीमा नदीच्या (चंद्रभागा) काठी वसलेले हे तीर्थक्षेत्र केवळ एक मंदिर नाही, तर संतपरंपरा, वारकरी संप्रदाय, समता, प्रेम, भक्ती आणि मानवतेचे जिवंत विद्यापीठ आहे. 'जय हरी विठ्ठल' हा मंत्र लाखो वारकऱ्यांच्या जीवनाचा श्वास आहे.

पंढरपूरचे ऐतिहासिक महत्त्व सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे महाराष्ट्रातील सर्वात प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीचे भव्य मंदिर असून देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला येथे भक्तांचा महासागर उसळतो. शेकडो वर्षांपासून चालत आलेली वारी ही जगातील सर्वात मोठ्या आणि शिस्तबद्ध आध्यात्मिक यात्रांपैकी एक मानली जाते.

पंढरपूरला 'भूवैकुंठ', 'दक्षिण काशी' आणि 'भक्तीची राजधानी' अशी अनेक विशेषणे लाभली आहेत. येथे आलेला प्रत्येक भक्त जात, धर्म, भाषा आणि आर्थिक भेद विसरून विठ्ठलाच्या चरणी लीन होतो.

पुंडलिकाची कथा आणि विठ्ठलाचे आगमन पंढरपूरचा इतिहास सांगताना भक्त पुंडलिकाचा उल्लेख अपरिहार्य आहे. पुराणकथेनुसार पुंडलिक हा आपल्या आई-वडिलांची अत्यंत भक्तिभावाने सेवा करणारा पुत्र होता. त्याच्या मातृ-पितृसेवेने प्रसन्न होऊन भगवान श्रीकृष्ण त्याला दर्शन देण्यासाठी आले. मात्र त्या वेळी पुंडलिक आपल्या आई-वडिलांच्या सेवेत मग्न होता. त्याने भगवानांना थांबण्यासाठी एक वीट पुढे सरकवली आणि सेवाकर्म पूर्ण झाल्यावर दर्शन घेतले.

भक्ताच्या सेवाभावाने प्रसन्न झालेल्या भगवानांनी त्या विटेवर उभे राहून भक्तांना दर्शन देण्याचे वचन दिले. म्हणूनच श्री विठ्ठलाला 'विठोबा', 'विठ्ठल', 'पांडुरंग' आणि 'विटेवरी उभा असलेला देव' असे संबोधले जाते. हात कमरेवर ठेवून विटेवर उभे असलेले विठ्ठलाचे रूप भक्तांसाठी संयम, प्रतीक्षा आणि भक्तवत्सलतेचे प्रतीक आहे.

वारकरी संप्रदायाची महान परंपरा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय हा समता, प्रेम आणि भक्तीचा संदेश देणारा महान संप्रदाय आहे. दरवर्षी लाखो वारकरी टाळ-मृदंगाच्या गजरात, अभंग गात, दिंड्यांमध्ये चालत पंढरपूरची वारी करतात. 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष करत हजारो किलोमीटरचा प्रवास करणारे वारकरी समाजाला शिस्त, संयम आणि सामूहिक जीवनाचे धडे देतात.

वारी ही केवळ यात्रा नसून ती जीवन जगण्याची पद्धत आहे. येथे प्रत्येक जण समान असतो. श्रीमंत-गरीब, उच्च-नीच, स्त्री-पुरुष असा कोणताही भेदभाव नसतो. सर्वांच्या मुखी एकच नाम असतेङ्क'विठ्ठल... विठ्ठल...'

संतांची पावन भूमी पंढरपूर हे अनेक संतांच्या कार्याने पावन झाले आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत



चोखामेळा, संत सावता माळी, संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई अशा अनेक संतांनी विठ्ठलभक्तीचा संदेश जनमानसात पोहोचवला.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून भगवद्गीतेचा अर्थ सर्वसामान्यांना समजावून सांगितला. संत तुकारामांच्या अभंगांनी समाजाला सत्य, प्रामाणिकपणा आणि ईश्वरभक्तीची शिकवण दिली. संत नामदेवांनी विठ्ठलाशी जिवलग मित्राप्रमाणे संवाद साधला. संत चोखामेळ्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला, तर जनाबाईने श्रमाला भक्तीचे रूप दिले.

चंद्रभागेचे महात्म्य पंढरपूरच्या पवित्र भूमीला चंद्रकोरीसारखा वळसा घालणारी भीमा नदी येथे 'चंद्रभागा' म्हणून ओळखली जाते. भाविक विठ्ठलाच्या दर्शनापूर्वी चंद्रभागेत स्नान करून आत्मशुद्धीचा संकल्प करतात. या नदीचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व अतिशय मोठे आहे.

आज मात्र वाढते प्रदूषण, प्लास्टिक कचरा आणि पर्यावरणीय बदल यामुळे चंद्रभागेचे अस्तित्व जपण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. नदी स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक भाविकाची सामूहिक जबाबदारी आहे.

'जय हरी विठ्ठल'चा आध्यात्मिक अर्थ 'जय हरी विठ्ठल' हा केवळ घोष नाही; तो जीवनाला दिशा देणारा मंत्र आहे. 'जय' म्हणजे विजय, 'हरी' म्हणजे दुःखांचा नाश करणारा परमेश्वर आणि 'विठ्ठल' म्हणजे भक्तांच्या हाकेला धावून येणारा देव. या मंत्राच्या उच्चाराने मनातील नकारात्मकता दूर होते, श्रद्धा दृढ होते आणि आत्मविश्वास वाढतो.

वारकरी मानतात की नामस्मरण हीच खरी साधना आहे. विठ्ठलाचे नाव घेतल्याने मनाला शांतता मिळते, अहंकार नाहीसा होतो आणि समाजसेवेची प्रेरणा मिळते.

वारीचा सामाजिक संदेश वारी समाजाला अनेक मूल्ये शिकवते. शिस्त, वेळेचे पालन, स्वच्छता, सामूहिक जीवन, पर्यावरण संरक्षण, व्यसनमुक्ती आणि मानवतेची भावना वारीतून अनुभवायला मिळते. लाखो लोक एकत्र चालूनही प्रेम, सहकार्य आणि अनुशासन टिकवून ठेवतात.

आजच्या धावपळीच्या आणि तणावग्रस्त जीवनात वारी आपल्याला संयम, सहनशीलता आणि साधेपणाचे महत्त्व शिकवते. आधुनिक समाजाने या मूल्यांचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे.

आधुनिक काळातील पंढरपूर आज पंढरपूरमध्ये भक्तांसाठी विविध सुविधा विकसित करण्यात येत आहेत. दर्शन व्यवस्था, रस्ते, निवास, स्वच्छता, वैद्यकीय सेवा आणि डिजिटल सुविधांमुळे भाविकांना अधिक सुलभ दर्शन मिळत आहे. तरीही मंदिर परिसराची पवित्रता, स्वच्छता आणि सांस्कृतिक परंपरा जपणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

पंढरपूर हे पर्यटन स्थळ म्हणून नव्हे, तर आध्यात्मिक संस्कृतीचे केंद्र म्हणून पुढील पिढ्यांसाठी जतन केले पाहिजे.

'जय हरी विठ्ठल' हा मंत्र महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. पंढरपूर ही केवळ देवदर्शनाची भूमी नसून समता, सेवा, भक्ती, प्रेम आणि मानवतेची शाळा आहे. येथे प्रत्येक वारकरी एकमेकांचा सोयरा असतो आणि प्रत्येकाच्या मुखी विठ्ठलनाम असते. संतांनी दिलेला भक्तीचा वारसा आजही लाखो लोकांच्या जीवनाला दिशा देत आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात भौतिक प्रगतीसोबत आध्यात्मिक मूल्ये जपणे तितकेच आवश्यक आहे. विठ्ठलभक्ती आपल्याला माणुसकी, सहकार्य, निसर्गप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा देते. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या जीवनात संतांचे विचार, विठ्ठलनाम आणि सदाचार यांचा स्वीकार करावा.

चला, संतांच्या पावलावर पाऊल ठेवत आपणही प्रेम, समता आणि सेवाभावाचा मार्ग स्वीकारूया. आपल्या मुखी अखंड एकच नाम घुमत राहो

**'जय हरी विठ्ठल... जय जय विठ्ठल... पांडुरंग हरी...!'**

# महाराष्ट्राची वारी : भक्ती, समता आणि संस्कृतीचा अखंड महोत्सव

'ज्ञानोबा-तुकाराम... जय जय रामकृष्ण हरी... विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल!' या नामघोषाने दुमदुमणारी महाराष्ट्राची वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून, ती महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, संतपरंपरेचा, सामाजिक समतेचा आणि मानवतेचा जिवंत उत्सव आहे. दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने लाखो वारकरी संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसह पायी चालत पंढरपूरकडे प्रस्थान करतात. शेकडो किलोमीटरचा हा प्रवास श्रद्धा, शिस्त, सेवा आणि समर्पणाचा अद्वितीय अनुभव देणारा असतो. जगभरातील अनेक अभ्यासकांनी वारीला सामाजिक एकात्मतेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून गौरविले आहे.

वारीची परंपरा अनेक शतकांपासून अखंड सुरू आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत जनाबाई, संत मुक्ताबाई आणि अनेक संतांनी विठ्ठलभक्तीचा संदेश सामान्य जनतेपर्यंत पोहोचविला. या संतांनी धर्माचा अर्थ केवळ कर्मकांडात नसून प्रेम, दया, सेवा आणि समतेमध्ये असल्याचे आपल्या अभंगांतून सांगितले. त्यांच्या विचारांचेच मूर्त स्वरूप म्हणजे महाराष्ट्राची वारी होय.

वारकरी संप्रदायाची सर्वात मोठी ओळख म्हणजे 'भेदाभेद अमंगळ' ही भावना. वारीमध्ये जात, धर्म, भाषा, श्रीमंती-गरीबी, स्त्री-पुरुष असा कोणताही भेदभाव नसतो. प्रत्येक वारकरी एकमेकांना 'माऊली' म्हणून संबोधतो. हा शब्द केवळ संबोधन नसून प्रेम, आदर आणि समानतेचा संदेश देणारा आहे. लाखो लोक एकाच ध्येयाने, एकाच श्रद्धेने आणि एकाच नामस्मरणाने चालत असतात. अशा प्रकारचे सामाजिक ऐक्य जगात क्वचितच पाहायला मिळते.

वारीची सुरुवात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदी येथील समाधी मंदिरातून आणि संत तुकाराम महाराजांच्या देहू येथून निघणाऱ्या पालख्यांपासून होते. या पालख्या ठरलेल्या मार्गाने विविध गावांतून प्रवास करत पंढरपूरला पोहोचतात. मार्गात गावोगावी वारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले जाते. नागरिक पाणी, अन्न, वैद्यकीय मदत आणि निवासाची व्यवस्था करतात. ही सेवा कोणत्याही अपेक्षेशिवाय केली जाते. सेवाभाव हेच वारकरी संप्रदायाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे.

वारीतील दिंडी व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध असते. प्रत्येक दिंडीला क्रमांक, प्रमुख आणि निश्चित नियम असतात. ठरलेल्या वेळेनुसार मुक्काम, प्रस्थान, भोजन आणि विश्रांती यांचे नियोजन केले जाते. लाखो लोकांचा सहभाग असूनही वारीतील शिस्त पाहून अनेक विदेशी पर्यटक आणि संशोधक आश्चर्य व्यक्त करतात. कोणत्याही मोठ्या व्यवस्थापन संस्थेला अभ्यास करण्यासारखे हे उत्तम उदाहरण आहे.

वारीमध्ये टाळ, मृदंग, वीणा, भगवा ध्वज, तुळशीची माळ आणि विठ्ठलनामाचा अखंड गजर वातावरण भक्तिमय करून टाकतो. अभंग, भारुडे, कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले जाते. संत तुकारामांचे अभंग, संत ज्ञानेश्वरांची ओवी आणि संत नामदेवांच्या रचना आजही वारकऱ्यांच्या ओठांवर असतात. नामस्मरणातून मनाला शांती, संयम आणि सकारात्मक ऊर्जा मिळते, असा वारकऱ्यांचा अनुभव आहे.

पंढरपूर हे वारकऱ्यांचे अंतिम ध्येय असले तरी वारीचा खरा अर्थ प्रवासात आहे. चालताना प्रत्येक पाऊल भक्तीचे, प्रत्येक क्षण सेवाभावाचा आणि प्रत्येक दिवस आत्मशुद्धीचा असतो. विठ्ठलाचे दर्शन हा प्रवासाचा शेवट नसून नव्या जीवनमूल्यांची सुरुवात असते. वारी माणसाला नम्रता, सहनशीलता, संयम आणि परस्पर



सहकार्य शिकवते.

वारी ही सामाजिक परिवर्तनाचीही चळवळ आहे. संतांनी आपल्या अभंगांतून अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली आणि प्रत्येक माणसात परमेश्वराचे दर्शन घ्यावे, असा संदेश दिला. आजही वारीत विविध समाजघटक एकत्र चालताना सामाजिक समतेचे सुंदर चित्र दिसते.

पर्यावरण संरक्षणाचाही संदेश वारी देते. पायी चालण्याची परंपरा, साधेपणाने जीवन जगणे, संसाधनांचा मितव्ययी वापर आणि निसर्गाशी सुसंवाद ही वारकरी जीवनशैलीची वैशिष्ट्ये आहेत. अलीकडच्या काळात प्लास्टिकमुक्त वारी, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण आणि जलसंवर्धन यांसारखे उपक्रमही वारीशी जोडले गेले आहेत. श्रद्धेबरोबरच पर्यावरणाची जबाबदारी स्वीकारण्याचा हा सकारात्मक बदल आहे.

वारीचा आर्थिक परिणामही महत्त्वाचा आहे. मार्गावरील गावांमध्ये व्यापाराला चालना मिळते. स्थानिक कारागीर, शेतकरी, लघुउद्योजक आणि स्वयंरोजगार करणाऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. धार्मिक पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळतो. त्यामुळे वारी ही केवळ आध्यात्मिक नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्याही महत्त्वाची परंपरा आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही वारीचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट, तरुण पिढी मोठ्या संख्येने वारीत सहभागी होत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून वारीचा संदेश जगभर पोहोचत आहे. डिजिटल युगातही विठ्ठलभक्तीची परंपरा तितक्याच उत्साहाने पुढे जात आहे. मात्र आधुनिकतेचा स्वीकार करताना वारीची साधेपणा, शिस्त आणि पावित्र्य टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

वारीत महिलांचाही मोठा सहभाग असतो. महिलांच्या दिंड्या, भजन मंडळे आणि सेवा कार्यामध्ये त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. वारकरी संप्रदायाने स्त्री-पुरुष समानतेची भावना प्रत्यक्ष कृतीतून जपली आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान सन्मान देण्याची प्रेरणा वारीतून मिळते.

आजच्या धावपळीच्या, स्पर्धात्मक आणि तणावग्रस्त जीवनात वारी माणसाला आत्मपरीक्षणाची संधी देते. भौतिक सुखाच्या मागे धावताना हरवलेली मानसिक शांतता, आपुलकी आणि माणुसकी पुन्हा मिळवून देण्याचे सामर्थ्य वारीमध्ये आहे. हजारो किलोमीटरचा प्रवास करूनही वारकरी थकत नाहीत, कारण त्यांच्या मनात विठ्ठलभक्तीची ऊर्जा असते.

महाराष्ट्राची वारी ही आपल्या सांस्कृतिक अस्मितेचा अभिमान आहे. ही परंपरा केवळ धार्मिक कार्यक्रम म्हणून न पाहता, सामाजिक समता, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संरक्षण, सेवा, शिस्त आणि मानवतेचा महोत्सव म्हणून जपली पाहिजे. संतांनी दिलेली शिकवण पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

आज जगाला शांतता, सहिष्णुता आणि बंधुभावाची गरज आहे. महाराष्ट्राची वारी या सर्व मूल्यांचा जिवंत संदेश देते. विठ्ठलनामाच्या गजरात लाखो लोक एकत्र चालतात, एकमेकांना आधार देतात आणि समाजाला प्रेमाचा संदेश देतात. हीच वारीची खरी शक्ती आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीची खरी ओळख आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, वारी ही केवळ पंढरपूरची वाट नाही, तर माणसाच्या अंतर्मनातून परमेश्वरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे. संतांनी दाखविलेल्या या भक्तीमार्गावर चालत राहणे, समतेची भावना जपणे आणि मानवतेचा संदेश पुढे नेणे, हीच विठ्ठलाच्या चरणी खरी सेवा ठरेल.

**'ज्ञानोबा-तुकाराम... जय जय रामकृष्ण हरी... विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल!'**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# पंढरीत आज वैष्णवांचा मेळा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**पंढरपूर** – 'तीर्थक्षेत्र पंढरपूरचा आषाढी सोहळा शनिवारी भक्तिमय वातावरणात संपन्न होत आहे. संतांच्या पालख्या दशमीला शुक्रवारी पंढरपुरात रात्री उशिरा दाखल झाल्यामुळे लाखो भाविक पंढरीत दाखल झाले आहेत. मठ, मंदिरे, संस्थाने, विश्रांती कक्ष, शहर परिसरात भाविक हरिनामाचा जयघोष करत आहेत. राज्यभरातून व परराज्यांतून आलेल्या वैष्णवांमुळे पंढरीत भाविकांचा महासागर उसळला आहे.

दरम्यान, श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सपत्नीक आज पहाटे २.२० ते ४.३० वाजेपर्यंत करण्यात येत आहे, अशी माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. आषाढी यात्राही सर्वात मोठी यात्रा असते. त्यामुळे या यात्रेनिमित्त शासकीय महापूजा मुख्यमंत्री यांच्या हस्ते होत असते. मुख्यमंत्री शुक्रवारी दुपारीच पंढरीत दाखल झाले आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालख्या वाखरी मुक्कामी होत्या.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांना घेऊन नामदेवांची पालखी दुपारी पंढरपूरच्या वेशीवर विसावा मंदिर इसबावी येथे दाखल झाली. येथे दोन्ही पालख्यांचा विसावा व उभे रिंगण पार पडले.




संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा पंढरीत दाखल होताना.



पंढरपुर : आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला तिर्थक्षेत्र पंढरपुरात चंद्रभागा नदीमध्ये स्नान करण्यासाठी वारकरयांची उसळलेली गर्दी छायाचित्रात दिसत आहे. शुक्रवारी दशमीच्या दिवशीच्या दिवशीच चंद्रभागा नदीचे वाळवे भक्तिसागरचा ६५ एकर, मंदिर परिसर,स्टेशन रोड, भक्तिमार्ग, प्रदक्षिणा मार्ग भाविकांनी फुलून गेला आहे.

## कॉरिडॉर पूर्वीची शेवटची वारी




# पंढरीत २० लाखांवर भाविकांची मांदियाळी

**आज आषाढी एकादशीचा सोहळा** आज आषाढी एकादशीचा सोहळा हरिनामाच्या गजराने दुमदुमली पंढरी : दर्शन रांगेत चार लाखांहून अधिक भाविक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

पंढरपूर – 'जाता पंढरीशी सुख लागे जीवा... अवघे गर्जे पंढरपूर, चालला नामाचा गजर...' अशा संतोक्तीची प्रचिती देत असलेला तीर्थक्षेत्र पंढरपूरचा आषाढी सोहळा शनिवार (दि.२५) भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे. संतांच्या पालख्या रात्री तीर्थक्षेत्र पंढरीत दाखल झाल्या आहेत. यंदा आषाढी सोहळ्यासाठी सुमारे २० लाखांहून अधिक भाविक पंढरीत दाखल झाले आहेत. यामुळे पंढरीनगरी भाविकांनी दुमदुमली आहेमजल-दरमजल करत देह, आळंदीसह विविध ठिकाणांहून संतांच्या पालख्या वाखरीत विसावल्या. त्या ठिकाणी रिंगण, आरती, कीर्तन, भजन, भारुडे झाली. वाखरीत हलक्या पावसाने हजेरी लावली. याआगोदर जूनच्या पुरुवातीलाच चांगला पाऊस झाला असल्याने राज्यभरातून त परराज्यांतून आलेल्या वैष्णवांमुळे पंढरीत भाविकांचा महासागर उसळला अमल्याचे चित्र दिसून येत आहे. राज्यात यंदा सुरुवातीलाच चांगला पाऊसकाळ झाला आहे. अ त्यामुळे पंढरपूर येथे आषाढी यात्रेकरिता एस.टी., रेल्वे, खासगी वाहनांची, तसेच पालख्यांबरोबर लाखोंच्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. ५,२०० जादा बसेस आषाढीकरिता सोडल्या आहेत. जादा रेल्वे गाड्यादेखील धावत आहेत: तर खासगी वाहनांनीदेखील भाविक मोठ्या संख्येने आले आहेत. १८ ठिकाणी पार्किंगउभारण्यात आली आहेत. दशमी दिवशी चंद्रभागा वाळवंट, भक्तिसागर ६५ एकर, मंदिर परिसर, स्टेशन रोड, भक्तिमार्ग, प्रदक्षिणा मार्ग भाविकांनी फुलून गेला आहे. दर्शन रांग मंदिरापासून पत्राशेडच्या पुढे गोपाळपूर येथून पुढे रांझणी रस्त्यावर ७ कि.मी.पर्यंत गेली आहे. दर्शन रांगेत ४ लाखांहून अधिक भाविक दाखल झालेले आहेत; तर ६५ एकर भक्तिसागरात ४ लाखांहून अधिक भाविक वास्तव्य करत आहेत. यंदा भाविकांची संख्या अपेक्षेपेक्षा जास्त वाढली आहे. त्यामुळे दर्शन रांग ७ कि. मी. अंतरावर पोहोचली आहे. दर्शन रांगेतील भाविकांना पदस्पर्श दर्शनासाठी किमान १० ते १२ तासांचा कालावधी लागत आहे, एका मिनिटाला साधारणपणे ५० भाविकांना पदस्पर्शदर्शन मिळत आहे.



## राष्ट्रीय करिअर सेवा पोर्टलच्या वर्धापनदिनानिमित्त रोजगार मेळाव्यात ६८ उमेदवारांची प्राथमिक निवड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – केंद्र शासनाच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या राष्ट्रीय करिअर सेवा पोर्टलच्या ११व्या वर्धापनदिनानिमित्त रोजगार मेळावा पार पडला. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मेळाव्यात ६८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.


या रोजगार मेळाव्यात नामांकित कंपन्यांच्या ६ उद्योजक प्रतिनिधींनी उपस्थित राहून नोकरी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. यात १२८ उमेदवार सहभागी झाले होते. मेळाव्यात क्रेडीट ॲक्सेस ग्रामीण लिमिटेड, प्रेसीजन मॅपिंग जीआयएस, क्रेस कॉर्पोरेशन, ईसीई एनर्जीज, स्वॅगी, आणि जाधव गिअर्स लिमिटेड या कंपन्यांनी सहभाग नोंदवून तरुणांना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. कार्यक्रमादरम्यान जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारसकर यांनी करिअरविषयक मार्गदर्शन केले. तसेच कौशल्य विकास अधिकारी अभिषेक ठाकरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शासकीय उपक्रमांतील उपलब्ध संधीचा लाभ घेऊन करिअर घडवण्याचे आवाहन केले. वैभव तेटू यांनी सूत्रसंचालन केले. मेळाव्यासाठी कनिष्ठ कौशल्य विकास अधिकारी सुभाष गुल्हाने, संदीप यादव, यंग प्रोफेशनल क्रपा अरगुलेवार, दिलीप तांभारे, प्रथमेश सोहाळे आणि जिल्हा समन्वयक रोहित मोंढे यांनी पुढाकार घेतला. रोजगार आणि कौशल्याशी संबंधित अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ncs.gov.in आणि maha swayam.in या अधिकृत संकेतस्थळांना भेट द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## '५० ग्रॅम पावडर टाकण्याची' धमकी देणाऱ्या पोलिसाची दुसरी बाजू: 'त्या पोलीस काकांना निलंबित करू नका', व्हायरल व्हिडीओतील तरुणाने सांगितली गाडीतील इनसाईड स्टोरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – 'खिशात ५० ग्रॅम पावडर टाकून कारवाई करेन' अशी धमकी देणाऱ्या मुंबई पोलीस कर्मचाऱ्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता.

त्या पोलिस कर्मचाऱ्यावरती कारवाई देखील करण्यात आली, मात्र, आता या प्रकरणाला एक वेगळे वळण मिळाले आहे. त्याच पोलिसांच्या गाडीत बसलेल्या तीन तरुणांपैकी एका तरुणाने पुढे येत या घटनेची 'दुसरी बाजू' समोर आणली आहे. 'ते पोलीस काका वाटतात तितके वाईट नव्हते, त्यामुळे त्यांना जास्त काळासाठी निलंबित (सस्पेंड) करू नका,' अशी विनंती या तरुणाने मुंबई पोलीस प्रशासनाला केली आहे.



### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |






**वरुड :** शहरातील शाकुंतल कॉलनी येथील अनुश्री प्रकाश विंचूरकर हिने चितारलेले श्री विठ्ठलाचे छायाचित्र.

**दिल्ली येथील जंतर-मंतरवर आंदोलनाला पाठींबा दर्शविण्यासाठी**

# संत्रा नगरीत बेमुदत धरणे आंदोलनाची सुरुवात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – दिल्ली येथील जंतर-मंतरवर अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी वरुड शहरात आजपासून बेमुदत धरणे आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. तालुक्यातील व शहरातील विचारवंत, नैतिकतेवर विश्वास ठेवणारे विद्यार्थी, पालक, देशप्रेमी नागरिक तसेच विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

या आंदोलनाची सुरुवात येथील महात्मा फुले चौकात म.फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर महात्मा फुले चौकात दिवस-रात्र सुरु राहणाऱ्या बेमुदत धरणे आंदोलनास प्रारंभ करण्यात आला.






या आंदोलनात डॉ.प्रवीण चौधरी, सुशील बेले, जि.प.माजी सभापती गिरीश कराळे, सचिन आंजीकर, तानाजी नाकट, मनिष धोटे, सतीश सोनुले, राहुल बोडखे, मनोज पतिंगे, मदन तायवाडे, राजाभाऊ कुकडे, रवींद्रभाऊ डोंगरे, शेषराव कडू, विलास पाटील, राजेंद्र बहुरुपी, जयश्रीताई पवार, विष्णू राऊत, दीपक भुयार, महाजनकर, चंद्रशेखर वरुडकर, हर्षल पारडसिंगे, राजेंद्र सोनुले, माणिक कुबडे, जितेश शहा, राहुल फुले, वनराज कराळे, सुमित गुर्जर, सुरज, अनुराग घोरमाडे, पांडुरंग भाकरे, भालेराव कडू, समीर पठाण, अफजल काझी, सोयल दिवाण, गोपाल उमेकर, प्रकाश गणोरकर, राजेंद्र सोनवणे, ॲड.पवन वाडीवे, अजिंक्य देशमुख, सतीश धोटे, मनोज लांडगे, चेतन देवते, स्वप्नील आजनकर, विकास ठाकरे, प्रमोद टाकरखेडे, आलिया तब्सुम शेख, नाझीम कुरेशी, विवेक इंगळे, जमीर पटेल, सविता काळे, मनिषा उईके, शुभम गजभिये, संजय नागले, पिंटू कोरडे, मनिष कुबडे, निलेश वडवाले, श्याम आजनकर, अशोक पवार, जावेद पठाण, युवराज आंडे यांच्यासह असंख्य नागरिक, विद्यार्थी, पालक व विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले आहेत.

आंदोलनकर्त्यांनी दिल्लीतील जंतर-मंतर परिसरात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी व नागरिकांवर झालेल्या पोलिस लाठीचार्ज तसेच आंदोलनकर्त्यांवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांचा तीव्र निषेध व्यक्त केला. संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्विकारुन तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, जोपर्यंत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत दिल्लीतील जंतर-मंतर आंदोलनाच्या धर्तीवर वरुड शहरातील हे बेमुदत धरणे आंदोलन अखंड सुरु राहील.

या आंदोलनात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठींबा द्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.

# ‘तिरंगा मार्च’च्या एक दिवस आधी राज ठाकरेंची पोस्ट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – २६ जुलै रोजी मुंबईत होणाऱ्या ‘तिरंगा मार्च’च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी (दि.२५) कार्यकर्ते आणि समर्थकांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. नीट आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा मोर्चा पूर्णपणे अराजकीय असावा, यासाठी कोणत्याही पक्षाचा झेंडा आणू नये, तसेच कोणत्याही राजकीय नेत्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करू नये, असे आवाहन त्यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे केले. राज ठाकरे यांची पोस्ट जशीच्या तशी – माझ्या तमाम महाराष्ट्र सैनिकांना आणि शिवसैनिकांना सस्नेह जय महाराष्ट्र, येत्या २६ जुलैला नीट परीक्षेतील गोंधळ, त्याबद्दल विद्यार्थ्यांचं सुरु असलेलं आंदोलन आणि ते आंदोलन चिरडण्याचा सरकारचा सुरु असलेला प्रयत्न याविरोधात आपण ’तिरंगा मार्च’ काढत आहोत. त्याबद्दल तुम्हाला आपल्या दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून, मध्यवर्ती कार्यालयांकडून सूचित करण्यात आलं असेलच.



**वरुड :** परमेश्वर संत रामपालजी महाराज यांना टोपी व दुपट्टा अर्पण करून आशीर्वाद घेतांना राजू पुसदकर, रंजना पुसदकर, मधुरा व हार्दिक पुसदकर.

# विठू माऊलीच्या नामघोषाने लाखनी नगरी दुमदुमली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**लाखनी** – आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर बाल विद्यामंदिर, लाखनी यांच्या वतीने भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने व टाळ-मृदंगाच्या गजरात लाखनी नगरी भक्तिमय वातावरणाने भारावून गेली. याप्रसंगी पालखीचे पूजन समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे सर तसेच शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर चॅरिटेबल फाउंडेशनचे अध्यक्ष आल्हाद भांडारकर यांच्या हस्ते करण्यात आले.

पालखीची सुरुवात साई मंदिर येथून करण्यात आली असून समारोप शिक्षण महर्षी बापूसाहेब लाखनीकर बाल विद्यामंदिर येथे झाला. या दिंडीस समर्थ महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाचे प्रमुख बाळकृष्ण रामटेके व त्यांच्या एनसीसी विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन संस्थेच्या संचालिका डॉ.सोनाली भांडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या दिंडीमध्ये वारकरी वेशभूषेतील चिमुकल्यांचा उत्साह विशेष आकर्षण ठरला. तसेच पालकवर्ग, नागरिक आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षण महर्षी बापूसाहेब लाखनीकर बाल विद्यामंदिराच्या सर्व शिक्षिकांनी परिश्रम घेतले व मोलाचे सहकार्य केले.

# डास उत्पत्तिस्थानामध्ये गप्पी मासे सोडण्याची धडक मोहीम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – उपजिल्हा रुग्णालय मोर्शी हिवताप व हत्तीरोग विभागामार्फत कायमस्वरूपी व तात्पुरत्या डासोत्पत्ती स्थानांमध्ये हिवताप, हत्तीरोग, डेंग्यू, चिकन गुनिया या किटकजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी विविध ठिकाणी गप्पी मासे सोडण्यात आले.

जैविक उपायोजन अंतर्गत किटकजन्य आजार नियंत्रणाकरीता अळीभक्षक गप्पी माशांचा वापर करण्यात येतो. साचलेल्या पाण्यात गप्पी मासे सोडल्यास ते डासांच्या अळ्यांचे भक्षण करून डासाची घनता कमी करण्यास मदत करतात. गप्पी मासे सर्व प्रकारच्या डास अळ्यांचे भक्षण करतात त्यामुळे हिवताप व हत्तीरोग निर्मूलन कार्यक्रमांमध्ये मदत म्हणून ही मोहीम राबविल्या जाते अशी माहिती व आरोग्य शिक्षण देण्यात आले.

ही मोहीम उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.शरद जोगी, हत्तीरोग अधिकारी डॉ.जुनेद यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

आरोग्य निरीक्षक विनय शेलुरे, प्रकाश मंगळे आरोग्य कर्मचारी प्रशांत बेहरे, संघपाल कांबळे, नंदू थोरात, अक्षय शेवाळे, ऋषिकेश दहेकर, विनोद डहाके यांनी गप्पी मासे धडक मोहीम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६०८/२०२६ ने.ता.२४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) सुभाष माणिक भुते, वय अं.५७ वर्ष, धंदा-मजुरी, २) सुधिर माणिक भुते, वय अं.४९ वर्ष, धंदा- मजुरी, दोघेही रा.जरुड, ता.वरुड, ३) प्रविण रामकृष्ण नांदेकर, वय अं.४७ वर्ष, धंदा- घरकाम, रा.नरखेड, ता.नरखेड, ४) अनिता ज्ञानेश्वर घोटकर, वय अं.५१ वर्ष, धंदा-घरकाम, रा.आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा, ५) सुलोचना संजयराव वसुले, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम, रा.मोवाड, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत माणिकराव रायभानजी भुते व कुसुमबाई माणिकराव भुते, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# ‘गुन्हेगार ठरवल्यास पोलीस उपायुक्तांच्या घराबाहेर आत्महत्या करेन’: माजी आमदार रवींद्र धंगेकर यांचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – पुण्यातील बांधकाम व्यावसायिक खलील शेख यांच्या आत्महत्या प्रकरणात आरोपी असलेले माजी आमदार व शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत गंभीर इशारा दिला. या प्रकरणात आपल्याला गुन्हेगार ठरवण्यात आले, तर पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांच्या घराबाहेर आत्महत्या करेन, असे त्यांनी म्हटले. या प्रकरणाशी आपला किंवा पत्नी प्रतिभा धंगेकर यांचा कोणताही संबंध नसल्याचा दावाही त्यांनी केला. गुलटेकडी येथील बांधकाम व्यावसायिक खलील शेख यांनी आत्महत्येपूर्वी व्हिडिओ तयार करून आर्थिक अडचणींसह काही व्यक्तींवर गंभीर आरोप केले होते. शेख यांच्या पत्नीच्या तक्रारीवरून स्वारगेट पोलिसांनी रवींद्र धंगेकर, प्रतिभा धंगेकर यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायालयाने धंगेकर दाम्पत्याला अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. जामीन मिळाल्यानंतर धंगेकर यांनी वकील विजयसिंह ठोंबरे यांच्या कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन आपली बाजू मांडली. संबंधित जागेवर पुनर्विकासासाठी ‘उत्कर्ष असोसिएट्स’ची स्थापना करण्यात आली होती. प्रकल्पाला रेरा मान्यता आणि बँकेचे कर्ज मिळाले होते. मात्र, जागा वक्फ बोर्डाशी संबंधित असल्याची नोटीस मिळाल्यानंतर काम थांबले.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८२/२०२६ ने.ता.१७/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती माधुरी मनोज शेलुरे, वय अं.५५ वर्ष, धंदा-गृहिणी

२) गौरव मनोज शेलुरे, वय अं.२३ वर्ष, धंदा- शिक्षण

रा.सुरळी, ता.वरुड, जि.नागपूर, ह.मु लक्ष्मीनारायण मंदिराजवळ, नंदनवन कॉलनी, नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** विनय सुदाम शेलुरे, वय अं.५१ वर्ष धंदा-नोकरी रा.रामकृष्ण कॉलनी, मोर्शी

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुदामपंत भानजीभाऊ शेलुरे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२४/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६०९/२०२६ ने.ता.२१/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) बेबीबाई मधुकराव काळमेघ, वय अं.६७ वर्ष, धंदा-घरकाम, २) नितीन मधुकराव काळमेघ, वय अं.४४ वर्ष, धंदा- खाजगी नोकरी, ३) दिपक मधुकराव काळमेघ, वय अं.४६ वर्ष, धंदा- खाजगी नोकरी, क्र.१ ते ३ रा.चनकापूर, रा.सावनेर, ४) विजया संजयजी कडु, वय अं.४८ वर्ष, धंदा-घरकाम, रा.इसापूर, ता.सावनेर, ५) ललिता शिवदास राऊत, वय अं.४९ वर्ष, धंदा- घरकाम, रा.सावनेर, ता.सावनेर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मधुकर दौलतराव काळमेघ, रा.चनकापूर, ता.सावनेर, जि.नागपूर** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६२०/२०२६ ने.ता.२७/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) रामदास पांडुरंग ठाकरे, वय अं.६७ वर्ष, धंदा-शेती, रा.वरुड, २) श्रीमती संगीता सुरेशराव ठाकरे, वय अं.५३ वर्ष, धंदा-गृहिणी, ३) आकाश सुरेश ठाकरे, वय अं. वर्ष, धंदा-शेती, क्र.२ व ३ रा.वाठोडा, ४) श्रीमती संगीता अरुण ठाकरे, वय अं.५० वर्ष, धंदा- गृहीणी, ५) रुषिकेश अरुण ठाकरे, वय अं.२८ वर्ष, धंदा- शेती, ६) श्रीमती शोभाबाई गणपत ठाकरे, वय अं.७७ वर्ष, धंदा- गृहीणी, ७) माधवी मंगेश राऊत, वय अं.३६ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.पुसला, ८) शोभा शेषराव शेळके, वय अं.६३ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.धाटुरवाडा, ता.नरखेड, ९) पुष्पा धनराज कराये, वय अं.७५ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.मारुड, ता.जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत पांडुरंगजी शिवरामजी ठाकरे व मयत अनुसया पांडुरंग ठाकरे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६१२/२०२६ ने.ता.२८/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) राहुल सदारामजी लोणारे, वय अं.४० वर्ष, धंदा-हॉटेल, २) मीराबाई सदारामजी लोणारे, वय अं.६५ वर्ष, धंदा- घरकाम, क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, ३) विद्याशिला प्रभाकर जांभुळे, वय अं.४४ वर्ष, धंदा- घरकाम, रा.अमरावती, ४) कमलकिशोरी सुशिलाकुमार बन्सोड, वय अं.४५ वर्ष, धंदा- घरकाम, रा.गोंदीया, ता.जि.गोंदीया

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** हितेंद्र सदारामजी लोणारे, वय अं.४२ वर्ष धंदा-प्रॉपर्टी डिलर, रा.वरुड, रा.वरुड

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सदाराम संपतराव लोणारे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१८/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# राष्ट्रविरोधी शक्तींनी कोणताही फायदा घेऊ नये याच विचाराने माझा राजीनामा पंतप्रधानांकडे दिला : धर्मेंद्र प्रधानांची राजीनाम्यावर प्रतिक्रिया

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – देशभरात नीट-यूजी परीक्षेतील कथित घोटाळ्यावरून पेटलेला वणवा आणि दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या तीव्र आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. 'जंतर-मंतरवर आणि देशात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या परिस्थितीचा राष्ट्रविरोधी शक्तींनी कोणताही फायदा घेऊ नये, देशाची एकता टिकून राहावी, एकाही



विद्यार्थ्याचे भविष्य कायदेशीर अडचणीत सापडू नये आणि आपल्या मुलांनी त्यांचा वेळ अभ्यास व करिअर बनवण्यावर घालवावा, याच विचाराने मी माझा राजीनामा मा. पंतप्रधानांकडे पाठवून दिला आहे,' अशा शब्दांत स्पष्टीकरण देत त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा सादर केला आहे.

'विद्यार्थ्यांचे भविष्य आणि वेळ महत्त्वाचा' आपल्या राजीनाम्याचे समर्थन करताना त्यांनी स्पष्ट केले की, देशातील लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य आणि त्यांचा मौल्यवान वेळ हा कोणत्याही वादापेक्षा मोठा आहे. आंदोलने आणि न्यायालयीन लढायांमध्ये विद्यार्थ्यांचा वेळ वाया जाऊ नये, तसेच ते कोणत्याही कायदेशीर किंवा प्रशासकीय अडचणीत सापडू नयेत, हीच सरकारची प्राथमिकता असायला हवी. विद्यार्थ्यांनी आता सर्व वाद मागे सारून पुन्हा एकदा आपल्या अभ्यासावर आणि करिअरवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.

धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनामा पत्रातील शब्द जसाच्या तसा मी गेल्या ४ दशकांहून अधिक काळापासून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणांसाठी समर्पित राहिलो आहे. एक मजबूत, सर्वसमावेशक आणि दूरदृष्टी असलेली शिक्षण व्यवस्था हीच एका सशक्त राष्ट्राचा पाया असते, असा माझा नेहमीच विश्वास राहिला आहे.



**वरुड :** पंढरपूर येथे आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांची सदिच्छा भेट झाली.

## फ्लॅटचा ताबा न देणाऱ्या बिल्डरला १० लाखांचा दंड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – विक्रीच्या एकूण रकमेपैकी ३० टक्के रक्कम स्वीकारूनही फ्लॅटचा ताबा न दिल्याबद्दल, मध्य मुंबई जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने चेंबूर येथील एका रिअल इस्टेट डेव्हलपरला निवृत्त शिक्षकाला १०.४५ लाख रुपये ८ टक्के वार्षिक व्याजासह परत करण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, आयोगाने मानसिक छळ आणि सेवेतील त्रुटींबद्दल ५०,००० रुपये भरपाई आणि कायदेशीर खर्चापोटी १०,००० रुपये देण्याचे आदेश दिले आहेत. डेव्हलपरने रक्कम परत न करणे ही सेवेतील त्रुटी दर्शवते. याशिवाय, आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अपयशी ठरूनही ग्राहकाचे पैसे स्वतःकडे ठेवून घेणे ही डेव्हलपरची अनुचित व्यापार पद्धत आहे.

# नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार : मंत्री छगन भुजबळ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – अंदरसुल येथे उभारण्यात आलेल्या नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा वेळेत उपलब्ध होवून ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम होईल.

असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले अंदरसूल, ता.येवला येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंदरसूल मुख्य इमारतीचे उद्घाटन मंत्री भुजबळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या केंद्राला तीन वेळा 'कायाकल्प' पुरस्कार



मंत्री भुजबळ म्हणाले की, या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात सुमारे ४६ हजार लोकसंख्या असून केंद्रामार्फत उत्कृष्ट आरोग्य सेवा दिली जात आहे.

स्वच्छता, सुयोग्य व्यवस्थापन व दर्जेदार सेवेमुळे या केंद्राला तीन वेळा 'कायाकल्प' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

येथे दररोज ८० हून अधिक बाह्यरुग्णांवर उपचार केले जातात, तर दरमहा सुमारे दीड हजारांहून अधिक रुग्ण ओपीडीचा लाभ घेतात. याशिवाय सुरक्षित प्रसूती सेवा, माता-बाल आरोग्य, लसीकरण, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, आपत्कालीन सेवा आदी विविध सुविधा प्रभावीपणे राबविल्या जात आहेत.


केंद्राला मिळालेला सन्मान हा केवळ इमारतीचा नसून येथे कार्यरत डॉक्टर, परिचारिका व सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेमुळे मिळाल्याचे सांगत मंत्री भुजबळ यांनी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून आरोग्य कर्मचारी नागरिकांची सेवा करत असून त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

# नीट पेपरफुटीनंतर केंद्र सरकारचा मोठा दणका!

## एनटीए मधील बड्या अधिकाऱ्यांची हकालपट्टी, मोठी भरती जाहीर!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – देशभरात गाजलेल्या 'नीट' परीक्षा पेपरफुटीच्या तीव्र वादानंतर केंद्र सरकारने आता 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' मध्ये आमूलाग्र बदल करण्यास सुरुवात केली आहे. या घोटाळ्याप्रकरणी विरोधक आणि विद्यार्थ्यांकडून जंतर-मंतरवर तीव्र आंदोलने केली जात असून, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी सरकार संसदेत अत्यंत कडक कायदा आणण्याच्या तयारीत आहे. दुसरीकडे, या घोटाळ्यात संशयित ठरलेल्या एनटीए मधील काही बड्या अधिकाऱ्यांवर थेट कारवाई




करत त्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. या कारवाईनंतर एनटीए मधील रिक्त पदे भरण्यासाठी तातडीने नव्या भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तज्ज्ञ समितीच्या शिफारशींनुसार नवी भरती शिक्षण मंत्रालयांतर्गत स्वायत्त संस्था म्हणून काम करणाऱ्या एनटीए कडून ४ 'जनरल मॅनेजर' पदांच्या भरतीसाठी अधिकृत जाहिरात काढण्यात आली आहे. यासोबतच, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या 'प्रतिभा सेतू' पोर्टलद्वारे १६ 'यंग प्रोफेशनल्स' पदांसाठी अर्ज मागवण्यात आले आहेत. ही संपूर्ण भरती प्रक्रिया प्रा.के.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीच्या शिफारशींनुसार राबवली जात आहे. परीक्षा प्रणालीत पारदर्शकता आणणे आणि संपूर्ण एनटीएच्या संरचनेत सुधारणा करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. अशी असेल पदांची रचना आणि जबाबदारी एनटीए मधील महाव्यवस्थापकांच्या चारही पदांवर सुरुवातीला तीन वर्षांच्या कंत्राटी तत्त्वावर नियुक्त्या केल्या जाणार आहेत. हे नव नियुक्त अधिकारी प्रश्नपत्रिकांची निर्मिती, परीक्षांचे गुणदान पद्धत, नॉर्मलायझेशन, इक्वेटिंग आणि कॅलिब्रेशन यांसारख्या तांत्रिक व गोपनीय प्रक्रियेवर थेट देखरेख ठेवतील. निवड झालेल्या सर्व उमेदवारांची नियुक्ती पुढील २४ महिन्यांच्या कालावधीत केली जाणार आहे. छएएढ घोटाळ्यानंतर परीक्षा यंत्रणेवरील गमावलेला विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी सरकारकडून ही धडक पावले उचलली जात आहेत.

